# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

**मुख्य कार्यालय**

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎२२६७ ०२१० /१४८ /२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

**माझगांव कार्यालय**

विक्रीकर भवन, ९ वा मजला,रुम नंबर ९१५, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई ४००२०३ ☎२३७४२१९१ फॅक्स : २३७८१०६१

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 ☎23742191 Fax : 23781061

ई-मेल sec_mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in


### सहायक अभियंता (विद्युत), श्रेणी-२, पूर्व परीक्षा - २०१०
### धारिका क्रमांक : ३७४(१)दोन(१)/ २०१०/तीन
### जाहिरात क्रमांक : ०१/२०१०

आयोगामार्फत सहायक अभियंता (विद्युत), श्रेणी - २, महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा, गट - ब पदावरील भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. त्याकरीता **रविवार दिनांक २८ नोव्हेंबर, २०१०** रोजी पूर्व परीक्षा घेतली जाईल. या पदासाठी पात्र असलेले उमेदवार प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज करू शकतात. पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| अ. क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि.जा. (अ) | भ.ज.(ब) | वि.मा.प्र. | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सहायक अभियंता (विद्युत),श्रेणी- २ | | १४१ | ३५ | १८ | ८ | ६ | ६ | १० | ६ | ४४ |
| | एकूण पदे - २७४ | महिला - | ४२ | ११ | ५ | २ | २ | २ | ३ | २ | १३ |
| | | खेळाडू - | ७ | २ | १ | - | - | - | १ | - | ३ |
| | | अपंग - | अल्पदृष्टी (P.S.) ३, अल्प बहिरेपणा (P.D.) २, अस्थिव्यंग (OL/OA) ३ | | | | | | | | |

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** महिला व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**२.३** अपंगासाठी दर्शविलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत.

**२.४** शासन निर्णय,सा.बां.वि.क्र.अपंग-२००४/प्र.क्र.३३२/सेवा-३,दिनांक१९ जुलै,२००८ नुसार खालील अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी पात्र आहेत :-
(१) अल्पदृष्टी (P.S.) (२) अल्प बहिरेपणा (P.D.) (३) अस्थिव्यंग (OL/OA)

**३. वेतनश्रेणी-** ₹ ९,३०० - ३४,८०० + ग्रेड पे ₹ ४,४००/ , एकूण वित्तलब्धी अंदाजित ₹ २३,७०५/-

**४. पात्रतेविषयक अटी :-**

**४.१ भारतीय नागरिक.**

**४.२ वयः- दिनांक ०१ फेब्रुवारी, २०११ रोजी** किमान **१९ वर्षे** व कमाल **३३ वर्षे** (मागासवर्गाकरिता **३८ वर्षे**).

**४.३** शासन आदेशानुसार माजी सैनिक, अपंग व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

**४.४ शैक्षणिक अर्हता :-**

**(१)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकीमधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीच्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

**(२)** शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांकःडीसीएस -१०८९/२१४८/का. सेवा -३,दिनांक २५ एप्रिल, १९९० नुसार महाराष्ट्रातील सांविधिक विद्यापिठाकडून प्रदान करण्यात येणा-या विद्युत अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स व पॉवर) व इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टिम इंजिनिअरिंग या दोन पदव्या विद्युत अभियांत्रिकी पदवीशी समकक्ष समजण्यात येतील.

**(३)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**(४)** पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु ते मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत त्यांनी पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**५.**प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे.अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना "** तसेच **" परीक्षा "** या विभागातील "सहायक अभियंता ( विद्युत), श्रेणी-२, महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा, गट-ब" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**६. शुल्क :**

**६.१** अमागास - ₹ २६०/- **६.२** मागासवर्गीय - ₹ १३५/-

**६.३** सदर शुल्क ऑनलाईन अर्जांची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल.

**६.४** महाराष्ट्रातील भारतीय स्टेट बँकांच्या शाखांची यादी आयोगाच्या www.mpsconline.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**७. अर्ज करण्याची पद्धत :-**

**७.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**७.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ११ ऑक्टोबर, २०१० ते दिनांक ३० ऑक्टोबर, २०१०** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

**७.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.

**७.४** विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यांतील अर्ज सादर करण्याची (ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर Transation ID नोंदविणे) संपूर्ण कार्यवाही आयोगाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे.

**७.५** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वतःचा अद्ययावत (Latest) फोटो (रुंदी ३.५ से.मी x उंची ४.५ से.मी) व स्वतःचा ई मेलआयडी असणे आवश्यक आहे. तसेच स्वतःची स्वाक्षरी व फोटो आयोगाच्या सूचनेनुसार विहित पद्धतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

**७.६ मदत :** अर्जाच्या ऑनलाईन स्वीकृतीच्या व्यवस्थेसाठी आयोगाने मे. वास्ट इंडिया प्रा. लि. या संस्थेची नियुक्ती केली असून, सदर संस्थेने ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्यासाठी उमेदवारांच्या सोयीकरिता महाराष्ट्रातील तालुका स्तरावर व विविध प्रमुख शहरांमध्ये ऑनलाईन अर्ज स्वीकृती केंद्र [Online Application Centre (OAC)] निश्चित केली आहेत. सदर केंद्रांची मदत उमेदवारांना घेता येईल. अशा केंद्रांची (OAC) ची यादी आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांकासह उपलब्ध आहे. अधिकृत केंद्राचा पत्ता व मदत **9757444020** या दूरध्वनी क्रमांकावरुन उपलब्ध करुन घेता येईल. या केंद्रावर उमेदवाराला ऑनलाईन अर्ज भरणे, उमेदवाराचे छायाचित्र व स्वाक्षरी स्कॅन करुन अपलोड करणे याकरिता मदत करण्यात येईल. तसेच, प्रथम टप्प्यातील अर्ज भरुन झाल्यानंतर भारतीय स्टेट बँकेमध्ये रोखीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी आवश्यक असलेले विहित नमुन्यातील चलनाची प्रत उपलब्ध करुन देण्यात येईल व भारतीय स्टेट बँकेमध्ये रकमेचा भरणा केल्यानंतर बँकेकडून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Transaction ID द्वारे अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी केंद्राची मदत घेता येईल. या सर्व सुविधेकरीता उमेदवाराला प्रत्येक परीक्षा / भरतीसाठी आयोगास अदा करावयाच्या शुल्काव्यतिरिक्त ₹ 24/- इतकी रक्कम सर्व्हिस चार्जेस म्हणून रोखीने संबंधित केंद्रचालकास अदा करावी लागेल. सदर मदत केंद्र संबंधित संस्थेने उमेदवारांच्या सोयीसाठी निश्चित केलेली असल्यामुळे आयोगाचा सदर केंद्रांशी काहीही संबंध नाही.

**७.७** प्रस्तुत परीक्षेकरिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करणा-या उमेदवारांना अर्जाची प्रत अथवा कोणत्याही प्रकारची कागदपत्रे अथवा ऑनलाईन अर्जातच असलेल्या शपथपत्राव्यतिरिक्त कोणतेही वेगळे शपथपत्र/ॲफिडेव्हीट आयोगाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

**८.** विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यातील ऑनलाईन अर्ज सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही दिनांक ३० ऑक्टोबर, २०१० रोजी **२३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेब लिंक बंद करण्यात येईल.

**९.** सदर जाहिरात आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**दी. प्र. मिरजकर**
उपसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुंबई :
दिनांक : ०१ ऑक्टोबर, २०१०.

**महत्वाचे**

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | परीक्षेचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | राज्यसेवा मुख्य परीक्षा- २०१० | --- | २५ सप्टेंबर, २०१० ते १० ऑक्टोबर, २०१० |
| २ | पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा- २००८ | --- | १६ ऑक्टोबर, २०१० |
| ३ | पोलीस उपनिरीक्षक मुख्य परीक्षा- २०१० | ०७ ऑक्टोबर, २०१० | २३ ऑक्टोबर, २०१० |
| ४ | पोलीस उप अधिक्षक (मोटार परिवहन), गट-अ चाळणी परीक्षा-२००९ | --- | २४ ऑक्टोबर, २०१० |
| ५ | सरकारी कामगार अधिकारी, गट-ब चाळणी परीक्षा- २००९ | --- | २४ ऑक्टोबर, २०१० |
| ६ | निरीक्षक प्रमाणित शाळा व संस्था, गट-ब चाळणी परीक्षा- २०१० | --- | ३१ ऑक्टोबर, २०१० |
| ७ | सहायक रासायनिक विश्लेषक, गट-अ चाळणी परीक्षा- २०१० | --- | १४ नोव्हेंबर, २०१० |